महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४१ /२०२४ दि.१३/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे सी. सी.एस. स्पोर्ट एल.एल.पी. या संस्थेमार्फत **'ISPL League Tennis Cricket Tournament दिवसरात्र'** या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. १५/०३/२०२४ रोजी **अंतिम सामना** आहे. नमूद क्रिकेट सामन्यासाठी कोअर कमिटी मधील सदस्य व टीम मालक तसेच मोठया प्रमाणात प्रेषक वर्ग उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा येथून व साकेत रोडने सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या सर्व टी.एम. टी.ए एन.एम.एम.टी. व सर्व प्रकारच्या खाजगी बसेस यांना **क्रिक नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर बसेस प्रवाशांना क्रिक नाका येथे उतरवून व तेथूनच प्रवाशांना घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा कडून व साकेत रोडने ए–वन फर्निचर व मुख्य बाजारपेठेत जाणाऱ्या चार चाकी, तीन चाकी व दुचाकी वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने माता रमाबाई चौक येथून सरळ पुढे जावून शितलामाता चौक येथून उजवे वळण घेवून जवाहर बाग व ए–वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) सिडको बस स्टॉप येथून ए–वन फर्निचर कडे व मुख्य बाजारपेठ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने दादोजी कोंडदेव स्टेडियम गेट नं. ३ समोरून गावदेवी कट व पारेख ट्रान्सपोर्ट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) ए–वन फर्निचर व राघोबा शंकर रोड येथून सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जवाहर बाग अग्निशामक केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र येथून उजवे वळण घेवून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** जवाहर बाग, अग्निशामक केंद्र ते माता रमाबाई चौक पर्यंत रोडचे उजवे व डावे दोन्ही बाजूस तसेच माता रमाबाई चौक ते गावदेवी कट, महागिरी पर्यंत रोडचे दोन्ही बाजूस वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १५/०३/२०२४ रोजी दुपारी १३:०० ते २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग, ठाणे शहर व पोनि ठाणेनगर वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.